(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# कोरोना संकट आणि भारत

**सहा.प्रा.दत्तात्रय देवन्ना कर्दपवार**

राज्यशास्त्र विभाग कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, चोपडा

..........................................................................................................................................

**सारांश :**

आंतरराष्ट्रीय स्तरावर कोरोना वायरस संकटामुळे अतिशय भयावह परिस्थिती निर्माण झालेली आहे. आज संपूर्ण जगात लहान देश असो किंवा मोठा देश असो विकसनशील देश असो, अविकसित असो किंवा विकसित देश असो प्रत्येक देशात कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव आहे. जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेत देखील जवळपास ७० हजार नागरिकांचा मृत्यू कोरोना विषाणूमुळे झाल्याचे दिसून येते. जगातील विकसित देश इटली, फ्रान्स, इंग्लंड व स्पेन सारख्या देशांमध्ये देखील मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी व वित्तहानी झालेली आहे. आज संपूर्ण जग लॉकडाऊन स्थितीत आहे. चीनमधील वुहान शहरातून उद्भवलेल्या या कोरोना संकटाने संपूर्ण जगाला आपल्या विळख्यात घेतले आहे. भारत देखील या विषाणूंपासून अलिप्त नाही. भारतात सध्या जवळपास ५० हजार रुग्ण कोरोना बाधित आहेत. तर जवळपास सोळाशे लोकांचा मृत्यू झाला आहे. तसेच ही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मोठ्या शहरांपासून तर लहान शहरांपर्यंत कोरोनाव्हायरस पसरत आहे. सोशल डिस्टनसिंगच्या माध्यमातून कोरोना विषाणूंना समाप्त करता येईल. परंतु भारतात आरोग्यविषयक अजागृकतेमुळे संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. प्रस्तुत शोध निबंधात कोरोना संकट आणि भारत या विषयावर अध्ययन करून निष्कर्ष नोंदवण्यात येणार आहे.

**प्रस्तावना** : आज संपूर्ण जग एका भयंकर परिस्थितीतून जात आहे. जगात अस्तित्वात असलेल्या अशा देशांमध्ये एकही देश संपूर्णपणे खुरणा विषाणूपासून मुक्त नाही आधुनिक काळात या तंत्रज्ञानाच्या युगात मनुष्याने अनेक शोध लावले आहेत आणि तंत्रज्ञान आणि विज्ञानाच्या आधारे आधुनिक आयुष्य जगत आहे चीनमधील सुहान शहरातून प्रसारित झालेले या कोरूना विशाल कोणत्याही देशातील वैज्ञानिकांनी औषध शोधल्याचे दिसत नाही आज जगातील जवळपास कमीतकमी 187 देश आणि प्रदेशातील 2,55,००० मृत्यूंसह, ३.६ दशलक्षांहून अधिक संक्रमणांची पुष्टी झाली आहे. भारतात आज जवळपास 48 हजार लोक कोरोना बाधित असून त्यापैकी ३२ हजार लोक अजूनही कोरोना ॲक्टिव आहेत. तर जवळपास १५०० लोकांचा मृत्यू झालाय. जवळपास १२ हजार लोक पूर्णपणे कोरोना मुक्त झाले आहेत. आज भारतासमोरील प्रमुख समस्या कोरोना पासून देशाला वाचविणे आहे. कोरोना प्रादुर्भावामुळे २३ मार्च २०२० पासून २१ दिवसांसाठी देशात लॉकडाऊन घोषित करण्यात आले आहे. त्यानंतर १५ एप्रिल ते ३ मे पर्यंत दुसऱ्यांदा लॉकडाऊनची घोषणा करण्यात आले. देशात ४ मे ते १७ मे पर्यंत तिसऱ्यांदा भारतात लॉकडाऊन घोषित करण्यात आले आहे. भारताच्या आर्थिक, राजकिय, सामाजिक, आरोग्य परिस्थिती आणि रोजगारावर अतिशय जास्त परिणाम होणार असून भारतासारख्या विकसनशील देशासाठी कोरोना एक महासंकट आहे. या संकटातून बाहेर पडण्यासाठी भारताला अनेक वर्ष संघर्ष करणे भाग आहे. भारताची अर्थव्यवस्था पूर्णतः विस्कळीत होण्याच्या परिस्थितीत आहे. म्हणून प्रस्तुत शोध निबंधातून कोरोना संकट आणि भारतातील आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि आरोग्यावर मोठया प्रमाणात परिमाण होणार आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून कोरोना संकट आणि भारत या विषयाचा अध्ययन करून निष्कर्ष नोंदवण्यात येणार आहे.

**विषय विवेचन** : जगातील लोकसंख्येच्या दृष्टीने सर्वात जास्त लोकसंख्या असणाऱ्या देशांमध्ये भारत दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. भारताची अर्थव्यवस्था देखील जागतिक स्तरावर चांगल्या स्थितीत आहे. परंतु कोरोना विषाणूंच्या संकटामुळे भारताची आर्थिक स्थिती कठीण परिस्थितीतुन जात आहे. कोरोना संकटामुळे जवळपास दीड महिन्यापासून देशात लॉकडाऊन असल्यामुळे भारताच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थितीवर विपरीत परिणाम होणार हे निश्चित आहे. संपूर्ण लॉकडाऊनमुळे उद्योगधंदे पूर्णतः बंद आहेत. केवळ जीवनावश्यक वस्तूंची निर्मिती सुरू आहे. त्यामुळे अनेक नागरिक बेरोजगार झाले आहेत. लोकांना कामधंदा नसल्यामुळे अतिशय भयावह परिस्थिती निर्माण झालेली आहे. कारखान्यांमध्ये काम नसल्यामुळे पगार मिळत नसल्यामुळे अनेक

मजूर स्थलांतर करत आहेत. सार्वजनिक बस सेवा, रेल्वे व विमान सेवा पूर्णपणे बंद असल्यामुळे अडकलेले नागरिक एक ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करू शकत नाही. स्थलांतरित मजूरांची स्थिती अतिशय वाईट आहे. हजारो नागरिक हजारो किलोमीटरचा प्रवास पायी करून आपल्या मूळ गावी जात आहेत. मजुरांचे अनेक लोंढे रस्त्यावर आहे. अन्न व पाणी मिळत नसल्याने काही मजूरांचा मृत्यू देखील झाला आहे. देशातील दारिद्र्यरेषेचे प्रमाण देखील जास्त असल्यामुळे हातावर पोट भरणारे लोक जास्त संख्येत देशात आहेत. अशा लोकांपुढे आज आज कुटुंबाच्या पालनपोषणाची समस्या निर्माण झाली आहे. सर्व व्यवसाय ठप्प असल्यामुळे समाजात असंतोषाची परिस्थिती उद्भवत आहे. तसेच कोरोना प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे दिल्ली, मुंबई, पुणे, नागपूर सारख्या महानगरांमध्ये विशेष झोन तयार करून त्याठिकाणी पूर्णतः लॉकडाऊन करण्यात आलं आहे. अशा परिस्थितीत त्या नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंची पुरवठा होणे आवश्यक आहे. परंतु भारतासारख्या विशाल देशात प्रत्येक नागरिकाला जीवनावश्यक वस्तु घरापर्यंत पोहोचवणे कठीण काम आहे. केंद्र सरकार कोरोना संकटाला तोंड देण्यासाठी आपल्या स्तरावरून प्रयत्नशील आहे. रिझर्व बँक ऑफ इंडिया व अर्थ मंत्रालय देखील विशेष योजना आणून नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रयत्नशील आहे. परंतु जोपर्यंत देशातील नागरिक कोरोना विषाणूच्या संदर्भात पूर्णता जागरूक होणार नाही. तोपर्यंत कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव थांबविणे अशक्य आहे आहे. या संकटकाळात देखील काही समाजकंटक समाजात धार्मिक तेढ निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. परंतु नागरिकांनी जागरूक राहून कोरोना संकटाला थांबवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे तेंव्हाच कोरोना संकट लवकर दूर करता येईल. त्यासाठी सोशल डिस्टनसिंग व स्वच्छता महत्त्वपूर्ण पर्याय आहे. डेन्मार्क, स्वीडन सारखे देश आज सोशल डिस्टनसिंगच्या माध्यमातून आपल्या देशातील कोरोना संकटाच्या परिस्थितीवर नियंत्रित प्रस्थापित करत आहे. भारतातील अनेक उद्योगपती व नागरिकांनी सामाजिक भान ठेवून मोठ्या प्रमाणात मदत देखील केलेली आहे. कोरोना विषाणूच्या संकटामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होईलच. परंतु त्यासोबतच राजकीय, सामाजिक, आर्थिक आरोग्यावर देखील मोठया प्रमाणात परिणाम होण्याची शक्यता आहे. कोरोना संकट आणि भारतावरील परिणाम पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**कोरोना संकट व आर्थिक परिस्थिती** : कोरोना संकटामुळे आज भारतातील संपूर्ण आर्थिक स्थिती कमजोर झालेली आहे. मोठे उद्योग व लहान उद्योग पूर्णपणे बंद पडलेले आहेत. त्यामुळे कारखान्यात काम करणारे अनेक मजूर स्थलांतर करुन मूळ गावी परत जात आहेत. मजूर गावाकडे गेल्यामुळे भविष्यात कारखान्यातील कामगारांचा प्रश्न निर्माण होईल. तसेच भारतातील शेअर बाजार व इतर आर्थिक संस्थांवर कोरोना संकटाचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. पहिल्या व दुसऱ्या लॉकडाऊन मध्ये उद्योगधंदे पूर्णपणे बंद ठेवल्यामुळे भारतात सध्या उद्योजक व व्यावसायिक यांच्यासाठी काठी काळ आहे. भारताची आर्थिक परिस्थिती येणाऱ्या दोन तीन वर्षांसाठी अतिशय कमजोर होण्याची शक्यता आहे. महत्त्वाचे उद्योग बंद असल्याने राज्य सरकार व केंद्र सरकारांचा महसूल बंद आहे. परंतु आर्थिक संकट अधिक वाढण्याची शक्यता असल्याने केंद्र सरकारने तिसऱ्या लॉकडाऊन मध्ये अनेक उद्योगांना सुरू करण्याची परवानगी देण्यात आली आहे. काही राज्यांनी त्वरीत महसूल मिळवण्यासाठी दारूची दुकाने काही शर्तीसह सुरू देखील केलेली आहेत. आज भारताला कोरोना संकटाशी लढा देण्यासाठी एका अहवालानुसार ६४ हजार करोड रुपयांची आवश्यकता आहे. भारतात दोन तीन वर्षात कोरोना संकटाचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता विशेषतज्ञांनी व्यक्त केली आहे.

**कोरोना संकट व राजकीय परिस्थिती** : कोरोना संकटामुळे भारतात केवळ आर्थिक संकटच नाही तर राजकीय आणि सामाजिक संकट देखील निर्माण होण्याची शक्यता आहे. भारतामध्ये कोरोनाचा पहिला रुग्ण ३१ जानेवारीला मिळाला. चीनमध्ये तोपर्यंत कोरोनाने थैमान घातले होते. भारतातील केंद्रीय नेतृत्वाने योग्य निर्णय घेऊन लगेच विदेशातून येणाऱ्या नागरिकांचा योग्य परीक्षण करणे आवश्यक होते. परंतु योग्य परीक्षण केल्याशिवाय देशात प्रवास करण्यावर बंदी न घातल्याने दिल्लीमधील मरकजसाठी हजारो नागरिक देशविदेशातुन एकत्र आले. तसेच मरकजमधून आपापल्या गावाकडे परत गेल्यामुळे देशातील कोरोना रुग्णामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. सार्वजनिक

कार्यक्रमांवर बंदी असतांना हजारो लोक एकत्र कसे येतात हे विचार करण्याची बाब आहे. कोरोनाने भारतीय राजकारणाच्या पुढे नवीन आव्हान उभे केले आहे. राजकारणात मतभिन्नता असतेच परंतु राष्ट्रीय व सार्वजनिक आरोग्यासाठी मतभिन्नता दूर ठेवता येते. याचे भान राहिलेले नाही. कारण कोरोनाचा प्रश्न अजूनही गंभीरपणे घेतला गेला नाही. या संदर्भातील दोन तीन उदाहरणे लक्षवेधक आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनता संचारबंदी, टाळी व थाळी, लाकडाऊन जाहीर केला, दिवे लावण्याची ताकद दिली. ही गोष्ट चांगली कामगिरी आहे. परंतु दिल्लीत तबलीगी समूहाने सार्वजनिक आरोग्याच्या काळजीचा भाग धाब्यावर बसवून धार्मिक भावना महत्त्वाची मानली. यामुळे दोन मुद्दे पुढे आले आहेत. एक, आरोग्यासाठी पूजा आणि व्यक्तीचे अस्तित्व यापैकी एकाची निवड करावी लागेल. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री अशा अतिशय महत्त्वाच्या दोन सत्तांमध्ये एकसूत्रीपणाचा अभाव दिसतो. हे पंतप्रधानांच्या पुढील मोठे आव्हान आहे. भारतात या संसर्गजन्य विषाणूचा प्रवेश आणि प्रसार चीन, युरोप आणि अमेरिका यांच्या तुलनेत उशीरा आणि संथ झालेला आहे. मात्र जागतिक आरोग्य संघटना आणि वैद्यकीय क्षेत्रातील अभ्यासकांच्या मते, भारतासारख्या १३७ कोटी इतक्या प्रचंड आणि अधिक घनतेच्या लोकसंख्या असलेल्या देशात, हा संसर्गजन्य रोग खूपच भीषण संकट आणि मानवी आपत्तीस कारण ठरू शकतो. भारतातील या संसर्गाचा सध्या दुसरा टप्पा सुरू असून, हा संसर्ग कोणत्याही परिस्थितीत तिसऱ्या आणि चौथ्या टप्यात प्रवेश करू नये यासाठी शासन आणि प्रशासन व्यवस्थेचे शर्थीने प्रयत्न सुरू आहेत. जगातील अत्यंत विकसित आणि उत्तम आरोग्य सुविधा असणाऱ्या देशातील यंत्रणांना सुद्धा या महाभयंकर साथीला रोखण्यात अपयश आले आहे. अशावेळी भारतात ही साथ वेळीच रोखणे हे शासन नेतृत्व आणि सर्वसामान्य जनता यांचे सारखेच कर्तव्य आहे. देशात लवकर निर्णय घेऊन लॉकडाऊन लावल्यामुळे इतर देशांच्या तुलनेत भारतात कोरोना संथ गतीने वाढत आहे. परंतु कोरोना संकट रोखण्यासाठी केवळ लॉकडाऊन एकच पर्याय नेहमी अवलंब करता येणार नाही. कारण लॉकडाऊनमुळे देशाची आर्थिक व सामाजिक स्थितीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. काही प्रमाणात विरोधक सत्ताधारी पक्षाला समर्थन करताना दिसत आहेत. परंतु काही दिवसापूर्वी पासून विरोधी पक्षाकडून मोठ्या प्रमाणात सत्ताधारी पक्षावर आरोप–प्रत्यारोप होतांना दिसत आहे. या संकटकाळात सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांनी एकजुटीने काम करणे आवश्यक आहे. परंतु भारतातील राजकीय परिस्थिती पूर्वीपासून संघर्षपूर्ण असल्यामुळे या संकटकाळात देखील अनेक राज्यातील विरोधी पक्ष आणि केंद्रातील विरोधी पक्ष यांच्यात संघर्षमय स्थिती आहे. विरोधकांच्या म्हणण्यानुसार, जागतिक आरोग्य संघटनेने निर्देश देऊनही भारत सरकारने वैयक्तीक आरोग्य साधने (personal protective equipment] or PPE) निर्यात करण्यावर बंदी घातली नव्हती. ती बंदी 19 मार्चला घालण्यात आली. म्हणजे पंतप्रधानांनी देशाला उदेशून भाषण केल्याच्या दुसऱ्या दिवशी बंदी घालण्यात आली. वैयक्तीक आरोग्य वापराच्या साधनांमध्ये मास्क, सर्जिकल मास्क, गाऊन, एन 95 मास्क आणि वैद्यकीय हातमोजांचा समावेश होतो. २४ मार्चला केंद्रीय आरोग्यमंत्री हर्षवर्धन म्हणाले की, गेल्या काही दिवसांमध्ये परदेशातून काही लाख लोक भारतात आले असून, त्यावर सरकारची नजर आहे. मात्र त्यापूर्वी केंद्र सरकारने अशा प्रवाशांच्या तपासणीसाठी कोणतीही यंत्रणा उभारली नाही. राजकीय एकजिनसीपणा असेल तरच कोरोना संकटापासून भारताला मुक्त करणे शक्य आहे असे म्हणता येईल.

**कोरोना संकट व आरोग्य परिस्थिती** : भारतातील आरोग्य सेवा जागतिक दृष्टिकोनातून विकसित देशांच्या तुलनेने कमकुवत आहे. ग्लोबल हेल्थ सिक्युरिटी इंडेक्स 2019 च्या अहवालानुसार एकूण 195 देशांमध्ये भारताचा 57 वा क्रमांक आहे. शासकीय रुग्णालयांची स्थिती अतिशय इतर देशांच्या कडून कमजोर आहे. एका अहवालानुसार देशातील शासकीय रुग्णालयात केवळ जवळपास 40 हजार वेंटीलेटरच उपलब्ध आहेत. कोरोना संकटाचा प्रादुर्भाव वाढल्यास भारत आरोग्यसेवा देण्यास पूर्णपणे सक्षम नाही. इटलीसारख्या जगात दुसऱ्या क्रमांकाचा आरोग्यसेवा असणाऱ्या देशात कोरोना विषाणूमुळे अतिशय भयावह परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याठिकाणी 65 वर्षावरील लोकांना वाचवण्यासाठी प्रयत्न न करता केवळ तरुण आणि रोगप्रतिकारक शक्ती असणाऱ्या लोकांना वाचवण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. देत आहे. इटलीसारख्या देशाची परिस्थिती बघितल्यानंतर भारताने योग्य नियोजन न केल्यास भारतात खूप मोठ्या प्रमाणात मनुष्य हानी होण्याची शक्यता आहे.

भारतात केवळ सात लक्ष शासकीय रुग्णालय आहेत. परंतु लोकसंख्येच्या दृष्टीने विचार केल्यास भारत सुविधांच्या बाबतीत कमजोर आहे असे म्हणता येईल. कोरोना बाधीत रुग्णांची संख्या वाढल्यास मोठ्या प्रमाणात जीवितहानी होण्याची शक्यता आहे. म्हणून भारताने आरोग्य सोयी सुविधा वाढवण्यावर भर देणे आवश्यक आहे.

**कोरोना संकट व सामाजिक परिस्थिती :** भारतात २०१२ नुसार जवळपास २२ टक्के नागरिक दारिर्द्य रेषेखालील लोकसंख्या आहे. त्यामुळे कोरोना संकटाचा सामाजिक परिणामाचा अध्ययन करणे आवश्यक आहे. देशातील २२ टक्के नागरिक रेषेखालील आहेत. तसेच अनेक नागरिक विविध राज्यांमध्ये कामासाठी स्थलांतरित झालेले आहेत. त्यामुळे भारताच्या सामाजिक परिस्थितीवर खूप मोठ्या प्रमाणात परिणाम कोरोना संकटामुळे होत आहे. पहिल्या व दुसऱ्या लॉकडाऊनच्या काळात खूप मोठ्या प्रमाणात स्थलांतर करून नागरिक आपापल्या मूळ गावी जाण्यासाठी पायीच निघाले होते. त्यातील काही नागरिक घरी पोहोचण्यापूर्वीच मृत्युमुखी देखील पडल्याचे दिसून वृत्त प्रकाशित झाले आहे. आजही देशात अनेक नागरिक असे आहेत की, त्यांना दोन वेळेसचा पुरेसा अन्न देखील मिळत नाही. त्यांच्यासाठी शासनस्तरावर मोठ्या प्रमाणात केले पाहिजे. समाजातील दारिर्द्यरेषेखालील नागरिक, बेरोजगार, स्थलांतरित नागरिक इत्यादींसाठी अन्नधान्याचा मदत करणे आवश्यक आहे. परंतु शासनस्तरावरून चालू केलेल्या योजना परिपूर्ण आहेत असे दिसत नाही. आजही काही नागरिक पोटभर अन्न देखील मिळत नाही. राज्य सरकार व केंद्र सरकारने योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने सामाजिक परिस्थिती नियंत्रणात आणता येईल. मुंबईमध्ये अनेक मजूर रस्त्यावर उतरले होते. तसेच गुजरात, बिहार व इतर राज्यांमध्ये अनेक मजूर शासनाच्या विरोधात रस्त्यावर आल्याचे उदाहरणे आहेत. शासनस्तरावर मजुरांसाठी रेल्वे, बससेवा सुरू करून त्यांना त्यांच्या मूळ पोहचवण्याशिवाय इतर मार्ग नाही. कारण कोरोना विषाणूंवर जोपर्यंत लस येत नाही. तोपर्यंत कोरोनावर पूर्णपणे नियंत्रण प्राप्त करता येणार नाही.

**कोरोना संकट व बेरोजगारी :** कोरोना संकटामुळे देशात खूप मोठ्या प्रमाणात बेरोजगारी निर्माण झालेली आहे. भविष्यात भारत संकटातून सावरल्यानंतर देखील भारतासमोर प्रमुख प्रश्न बेरोजगारी राहील. या बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देणे व त्यांना योग्य मोबदला मिळवून देणे शासनाची प्राथमिक जबाबदारी राहील. त्याशिवाय बेरोजगारीची समस्या यशस्वीपणे सोडवता येणार नाही. भारतात कोरोना संकटापूर्वी 2019 च्या अहवालानुसार बेरोजगारीचे प्रमाण 7.2 टक्के होती. परंतु सध्या लॉकडाऊनमुळे बेरोजगारीचे प्रमाण 27 टक्के वर पोहोचले आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे. महाराष्ट्रात बेरोजगारीचे प्रमाण 20.9 टक्के आहे. ग्रामीण भागातील बेरोजगारीचे प्रमाण 26.69 टक्के तर शहरी भागात 29.5 टक्के आहे. मोठ्या प्रमाणात उद्योग धंदे बंद पडल्यामुळे बेरोजगारीचा प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे अनेक नागरिक स्थलांतर करून आपल्या मूळ गावी जात आहेत.

**निष्कर्ष :** १) कोरोना संकट दूर करण्यासाठी सर्व नागरिकांनी स्वच्छता ठेवून बाधित व्यक्तीपासून सुरक्षित अंतर ठेवणे आवश्यक आहे.

२) शासनाने बेरोजगार, स्थलांतरीत व दारिर्द्य रेषेखालील लोकांसाठी विशेष योजना तयार करून त्याची योग्य अमलबजावणी करणे आवश्यक आहे.

३) सत्ताधारी व विरोधी पक्ष यांच्यात एकमत असल्याशिवाय कोरोना विषाणू संकटाचे नियोजन योग्य दिशेने करता येणार नाही.

४) लॉकडाऊनमुळे अनेक व्यवसाय बंद पडले आहेत. लहान व्यावसायिकांसाठी विशेष योजना आणणे आवश्यक आहे.

५) कोरोना संकटाचा सामना करतांनाच अर्थव्यवस्था सावरण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1.www-maharashtratimes-com
2.www-m-lokmat-com
3.www-m-marathi-thewire-com
4.www-theprint-in
5.www-wikipidea-org